दिनांक १६/०९/२०२३

# प्रेसनोट

## जळगाव येथील कासोदा पोलीस ठाणे, हद्दीतील रेती व्यावसायीकाच्या खुनाच्या गुन्हयातील पाहिजे आरोपीस मुंबई गुन्हे शाखेकडुन अटक

दिनांक १९/०३/२०२३ रोजी फिर्यादी श्री. किरण सुभाष पाटील वय ३७ वर्षे यांचा चुलत भाऊ नामे सचिन उर्फ सोनू देवीदास पाटील, वय ३६ वर्षे धंदा- रेती व्यवसायीक **(मयत)** यास निलेश ज्ञानेश्वर देसले याचे सांगण्या वरून अज्ञात इसमांनी कट रचुन गिरणा नदी काठी खॉजामिया दर्गा उत्राण, एरंडोल शिवारात निलेश व सोनू याच्यातील रेतीच्या पैशाच्या देवाण-घेवाणीच्या वादातून अज्ञात इसमांनी धारधार हत्याराने वार करून जिवे ठार मारले. म्हणुन दिनांक १९/०३/२०२३ रोजी कासोदा पोलीस ठाणे, जिल्हा जळगाव गु.र.क्र. २२/२०२३ कलम ३०२, १२०(ब), ३४ भादवि सह कलम ४, २५ भा.ह.का. येथे गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयात यापुर्वी ०३ आरोपीतांना अटक करण्यात आली होती. पाहिजे आरोपीतांचा पोलीस ठाणे कडुन शोध सुरु होता.

दि. १५/०९/२०२३ रोजी कक्ष-१२ चे पोह संतोष राणे व पोह अमोल राणे यांना कासोदा पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्हयातील पाहिजे आरोपीत हा रुम नं. १३१३, १३ वा मजला, दरवेश एसआरए बिल्डींग, पेणकरपाडा, मिरारोड, जिल्हा ठाणे येथे येणार असल्याची माहिती मिळुन आली. त्याप्रमाणे कक्ष-१२ चे पथकाने नमुद ठिकाणी सापळा रचला असता पाहिजे आरोपीत इसम, वय ३२ वर्षे हा नमुद ठिकाणी मिळुन आला. त्यास ताब्यात घेवुन कक्षात आणुन त्याकडे विचारपुस केली असता तोच नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपीत असल्याचे निष्पन्न झाले. सदर आरोपीतास ताब्यात घेतले बाबत कासोदा पोलीस ठाणे यांना संदेश देण्यात आला होता. त्याप्रमाणे त्यांनी आरोपीताचा ताबा घेतला आहे.

**<u>आरोपीताचा गुन्हेगारी अभिलेख :-</u>**

पवई पोलीस ठाणे १) गुरक्र. ४४५/२०११ कलम ४५२, ३२४, ४२७, ३४ भादवि २) गुरक्र. १७८/२०१३ कलम ३०७, ३२४, ५०४, ३४ भादवि व ३) गुरक्र. ३३२/२३ कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादवि ४) गुरक्र. २७७/१७ कलम ३९५, ३९७, ३६४, ५०६(२) भादवि सह कलम ३, २५ भाहका.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. शशि कुमार मिना, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१), श्री. अमोघ गांवकर, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (प्र-उत्तर), श्री. काशिनाथ चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक विलास भोसले, पोनि दिलीप तेजनकर, सपोनि विजय रासकर, पोउनि खानविलकर, सफौ. कारंडे, पोह लक्ष्मण बागवे, कल्पेश सावंत, बाळकृष्ण लिम्हण, सुनिल चव्हाण, संतोष राणे, संतोष बने, शैलेश बिचकर, अमोल राणे, विशाल गोमे, प्रसाद गोरुले, पोशि सचिन जाधव, चंद्रकांत शिरसाठ व सफौचा कैलाश सावंत, यांनी पार पाडलेली आहे.